दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ५४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२५ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## नसीम खान यांचा मुंबई काँग्रेसच्या प्रचार समिती अध्यक्षपदाचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या उदयपूर येथील नवसंकल्प शिबिर घोषणापत्रातील 'एक व्यक्ती' एक पद' या घोषणेच्या अंमलबजावणीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस मध्ये सुरुवात झाली आहे. प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष व माजी मंत्री नसीम खान यांनी मुंबई काँग्रेसच्या प्रचार समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

नसीम खान यांच्याकडे प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आणि मुंबई काँग्रेसच्या प्रचार समितीचे अध्यक्ष अशी दोन पदे होती. प्रभारी एच. के. पाटील यांच्या उपस्थितीत मुंबई काँग्रेसच्या बैठकीत नसीम खान यांनी राजीनाम्याची घोषणा केली. व काँग्रेस अध्यक्षा सोनियाजी गांधी यांच्याकडे पत्राद्वारे आपला राजीनामा दिला आहे. एक व्यक्ती एक पद असावे या निर्णयानंतर महाराष्ट्रातून राजीनामा देणारे नसीम खान हे पहिले पदाधिकारी ठरले आहेत. नसीम खान यांनी स्वत:हून त्यांच्याकडील दोन पैकी एका पदाचा राजीनामा दिला आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'माहिती भवन' इमारत हस्तांतरणाचा सामंजस्य करार

# 'माहिती भवन' प्रसारमाध्यमांसाठी उपयुक्त ठरेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**पूर्वीच्या आणि आताच्या माध्यमांमध्ये झालेला बदल लक्षात घेता माहिती व जनसंपर्क विभागाचे 'माहिती भवन' प्रसारमाध्यमांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.**

नवी मुंबईतील नेरुळ येथे माहिती भवन इमारत हस्तांतरणाचा सामंजस्य करार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि सिडको यांच्यात आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव दीपक कपूर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्यात सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले. सह्याद्री अतिथीगृहात आयोजित या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, दैनिक सामनाचा मी देखील काही काळ संपादक होतो, त्यामुळे राजकारण आणि पत्रकार यांच्यातील संबंध लहानपणापासून पाहत मी मोठा झालो, त्यामुळे पत्रकारितेशी माझे कायम ऋणानुबंध आहेत. पूर्वीच्या आणि आताच्या माध्यमांमध्ये बराच बदल झाला असून खिळ्यांच्या ब्लॉकच्या टाईपसेटिंगपासून मोबाईलपर्यंतचा पत्रकारितेचा प्रवास थक्क करणारा आहे. आता एका क्षणात जगभरात माहिती पाठवता येते आणि हे काम करण्यासाठी पत्रकारांना एका ठिकाणी बसता यावे याकरिता माहितीभवन निश्चितच उपयुक्त ठरेल. चुकीच्या माहितीवर आधारित अनेक बातम्या प्रसारित किंवा प्रसिद्ध होत असतात, त्या बातम्यांची वस्तुस्थिती वेळोवेळी जनतेसमोर मांडण्याबरोबरच चुकीच्या बातम्यांचे खुलासे होणे आवश्यक आहे. माहिती भवनची संकल्पना महत्त्वपूर्ण असून येथे सुरु करायच्या उपक्रमांचा सविस्तर आराखडा तयार करण्याचे निर्देशही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामकाजाचे कौतुक केले. नवी मुंबईतील नेरूळ येथे माहिती भवनाची अत्याधुनिक इमारत विभागाच्या कामकाजास उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. या माहिती भवनामध्ये पत्रकार संघटनांच्या कार्यक्रमांबरोबरच महासंचालनालयाकडील असलेल्या ग्रंथांचे डिजिटायझेशन करुन डिजिटल ग्रंथालय लवकरच सुरु होईल. असा विश्वास व्यक्त करुन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे बळकटीकरणाची ग्वाही यावेळी राज्यमंत्री कु. तटकरे यांनी दिली.




माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर यांनी मान्यवरांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. ते म्हणाले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय वृत्तसंकलनाबरोबरच माहितीचे विश्लेषण देखील करीत असते. अलिकडच्या काळात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार विभागाने केल्यामुळे कामाच्या पद्धती बदलल्या आहेत. या बदललेल्या कामाच्या पद्धतीसाठी माहिती भवनाची संकल्पना उपयुक्त ठरेल. माहिती भवनसाठी केलेल्या सहकार्याबद्दल नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांचे आणि सिडकोचे श्री. कपूर यांनी आभार मानले. या माहिती भवनामध्ये माध्यम प्रतिसाद केंद्र, डिजिटल ग्रंथालय, माध्यम प्रशिक्षण केंद्र आणि पत्रकार कक्ष सुरु करण्यात येणार असल्याचेही श्री. कपूर यांनी सांगितले. यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी मनोगत व्यक्त केले. सिडकोची ही इमारत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला देखभाल दुरुस्तीसाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, आता ही इमारत प्रत्यक्ष आज हस्तांतरित करण्यात येत असल्याचे सांगून या इमारतीमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे डॉ. मुखर्जी यांनी सांगितले. या कार्यक्रमास संचालक (वृत्त–जनसंपर्क) दयानंद कांबळे, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, उपसंचालक (प्रकाशने) अनिल आलुरकर, सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी श्रीमती प्रिया रातांबे यांचेसह माहिती व जनसंपर्कचे आणि सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ सहायक संचालक श्रीमती मीनल जोगळेकर यांनी तर संचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी यांनी आभार मानले.

## रिक्षा चालकास जबर मारहाण ; उपचारादरम्यान मृत्यू

**दै.रायगड नगरी । तळा**

शेणाटे येथे मागील भांडणाच्या रागातून एका रिक्षा चालकास जबर मारहाण करण्यात आली असून जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना तळा तालुक्यात घडली आहे. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार शेणाटे येथील दिनेश बटावले हे रिक्षातून तळा येथे येत असताना मौजे खांबवली गावच्या स्मशानभूमीजवळ आरोपी रुपेश बटावले व गणेश बटावले हे अचानक रिक्षाच्या समोर येऊन त्यांनी मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करीत दिनेश बटावले हे बसलेल्या रिक्षाची समोरील काच दगड मारून फोडली. तसेच रिक्षा चालक बाहेर पडल्यानंतर दोन्ही आरोपींनी दिनेश बटावले यांना बाहेर काढून हाता बुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी दिनेश बटावले यांना जवळच असलेल्या स्मशानभूमीजवळ ढकलत घेऊन जात त्यांना खाली पाडले व दोन्ही आरोपींनी मोठमोठ्या दगडांनी त्यांच्या उजव्या पायावर मारून पाय मोडला शिवाय डोक्याला देखील गंभीर दुखापत करून दमदाटी केली व तेथून पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी घटनास्थळी धाव घेतली.जखमीला तातडीने तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असता दुखापत गंभीर असल्याने जखमीला मुंबई येथील सायन रुग्णालयात हलविण्यात आले परंतु उपचारादरम्यानच दिनेश बटावले यांचा मृत्यू झाला. याबाबत तळा पोलिस ठाण्यात आरोपींवर गु.र.नं.४८/२०२२ भा.द.वी.सं.कलम ३२६, ४२७, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार आर.बी.बांन्द्रे हे करीत आहेत.



## सुरू असलेली सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत : खा.श्रीरंग बारणे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सर्वसामान्य गरजू नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणे, हा त्यांचा हक्क आहे. त्यांना हा हक्क मिळवून देणे हे शासकीय अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. यानुषंगाने जिल्ह्यात विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सुरु असलेली सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत, अशा सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व विभागाच्या खातेप्रमुखांना आज येथे केल्या.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) आढावा बैठक समिती अध्यक्ष खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार सुनील तटकरे, सर्वश्री आमदार भरत गोगावले, आ.रविंद्र पाटील, आ.महेंद्र थोरवे, आ.महेश बालदी, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक (अलिबाग) आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक (रोहा) आप्पासाहेब निकत, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्यासह समिती सदस्य, विशेष निमंत्रित सदस्य व शासकीय विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय .../२

## संक्षिप्त...

### शिवसेनेकडून राज्यसभेसाठी संजय पवार यांना उमेदवारी जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यसभेच्या सहाव्या जागेवरुन सुरु असलेल्या चर्चांना अखेर शिवसेनेने पूर्णविराम दिला आहे. शिवसेना संभाजीराजे छत्रपती उमेदवारी देणार की नाही, यावर तर्क–वितर्क लढवले जात असताना कोल्हापूरचे जिल्हाप्रमुख असलेले संजय पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली.

संजय पवार हे शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते आहेत. संजय पवार हे शिवसेनेचे मावळे आहेत, मावळे असतात म्हणून राजे असतात, असे म्हणत संजय राऊत यांनी अप्रत्यक्षपणे संभाजीराजे छत्रपती यांना टोला लगावला. तसेच, संजय पवार हा शिवसेनेचा मावळा आहे. उद्धव ठाकरेंनी या मावळ्याला उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या तीस वर्षांपासून संजय पवार शिवसेनेत सक्रिय आहेत. राज्यसभेच्या दोन्ही जागा शिवसेनेच्या आहेत आणि त्या निवडून येतील, असे संजय राऊत म्हणाले. संजय पवार यांचं नाव निश्चित झाल्यानंतर त्यांच्याशी माध्यमांनी संपर्क साधला. त्यावर नाव जाहीर झाल्यानंतर माझ्यासारख्या शिवसैनिकाला आनंदच होणार असल्याचं संजय पवार यांनी सांगितलं.

## पॅनेसिया हॉस्पिटल मध्ये अद्ययावत कॅथ लॅब रुग्णांच्या सेवेमध्ये रुजू

### नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह यांच्या हस्ते झाले उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉक्टर सुभाष सिंग संचलित पनवेल येथील पॅनेसिया हॉस्पिटल मध्ये अद्ययावत कॅथ लॅबचे उद्घाटन नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंग यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार बाळाराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवर्जून उपस्थित राहत डॉक्टर सुभाष सिंग आणि त्यांच्या सर्व सहकार्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

गेली बावीस वर्ष रुग्णांना अविरत सेवा देणारे पॅनेशिया हॉस्पिटल रुग्ण सेवेतील अद्ययावत आणि कालानुरूप बदलत जाणाऱ्या उपचार पद्धतींचा सातत्याने अवलंब करत आलेले आहे. यापूर्वीदेखील पॅनेसिया हॉस्पिटल मध्ये कॅथ लॅब फॅसिलिटी उपलब्ध होती. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्यांची तपासणी करणे, गरज पडल्यास त्या ठिकाणी स्टेंट टाकण्याची प्रक्रिया करणे यासाठी कॅथ लॅब ची नितांत आवश्यकता असते.

पॅनेसिया येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या कॅथ लॅब मध्ये अशा शस्त्रक्रिया मेंदू मध्ये देखील केल्या जातील. यापूर्वी अशा शस्त्रक्रियांसाठी पनवेल परिसरातील रुग्णांना नवी मुंबई किंवा मुंबई येथे जावे लागे. एका दिवसामध्ये साधारणपणे १५ ते १६ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याची क्षमता नव्याने सुरू करण्यात आलेल्या कॅथ .../२

> **यापूर्वी देखील आमच्या हॉस्पिटलमध्ये कॅथ लॅब सुविधा उपलब्ध होती.ऋए कंपनीच्या मशीनद्वारे आम्ही हृदयाचे आजार असणाऱ्या रुग्णांवरती ॲन्जिओग्राफी, एनजिओप्लास्टी सारख्या प्रोसिजर करत असू. परंतु आता अपग्रेड केलेल्या कॅथ लॅब चे माध्यमातून मेंदूमध्ये असणाऱ्या रक्तवाहिन्यांमधील ब्लॉक्स काढणे आणि त्या ठिकाणी स्टेंट टाकणे ही प्रक्रिया देखील याठिकाणी होऊ शकणार आहे. रुग्ण सेवा या क्षेत्रांमध्ये जे जे उत्तम अत्युच्च आणि गरजेचे आहे त्या त्या सुविधा पुरवणे यासाठी पॅनेशिया हॉस्पिटल यापूर्वी देखील कटिबद्ध होते व यापुढेही राहील.**
>
> **डॉ.सुभाष सिंग, संचालक, पॅनेसिया हॉस्पिटल**

## शिवसंपर्क अभियानाचा दुसरा टप्पा पनवेलमध्ये उत्साहात : खा.राजन विचारे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील अजीवली गावात आदिवासी मेळावा संपर्क अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, विधानसभा संघटक दीपक निकम, तालुका संघटक भरत पाटील, महानगर समन्वयक दीपक घरत, पनवेल ग्रामीण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, एकनाथ म्हात्रे, उपशहर प्रमुख नवीन पनवेल ज्ञानेश्वर भंडारी, करमाळे विधानसभा संपर्क प्रमुख बापूसाहेब मोरे व शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या शिवसंपर्क अभियानात आदिवासी पाड्यात आयोजित केलेल्या सभेत आदिवासी बांधवांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. अंत्योदय योजना, संजय गांधी निराधार योजना अशा अनेक प्रकारच्या योजनांमध्ये येणाऱ्या अडचणी बद्दल चर्चा करण्यात आली.

यावेळी उपस्थित आदिवासी बांधवांना भविष्यात कोणत्याही .../२

### सिडकोतर्फे कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण

## ९०८ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागास हस्तांतरण

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडकोतर्फे दि. २४/०५/२०२२ रोजी एकूण सुमारे ९०८ हेक्टर कांदनवळाखालील जमीनीच्या हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. यापैकी २७९ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात असून सिडको क्षेत्रातील उर्वरित ६२९ सिडकोच्या ताब्यात नसलेल्या जमीनीकरिता ना–हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. आदित्य ठाकरे, मा. पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून दि. १८/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सिडकोस कांदळवनाखालील जमीन वन विभागास हस्तांतरित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.



या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. विरेंद्र तिवारी, अति. प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, महाराष्ट्र, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. रवी कुमार, मुख्य नियोजनकार, सिडको आणि श्री. आदर्श रेड्डी, उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष हे प्रामुख्याने उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षण व संवर्धन उपक्रम आणि शाश्वत विकासासाठी सिडकोने नेहमीच सहकार्य केले आहे. याचाच एक भाग म्हणून मा. श्री. एकनाथ शिंदे, नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर कांदळवन क्षेत्राचे वन विभागास हस्तातंरण करण्यात आले आहे.

सिडको महामंडळाच्या ताब्यात असलेली ठाणे तालुक्यातील सुमारे १४५८ हेक्टर कांदळवनाखालील क्षेत्र यापूर्वीच वनविभागाकडे हस्तांतरीत .../२

# भय इथले संपत नाही

गगनचुंबी इमारतींनी मुंबईचे आकाश व्यापले, रस्ते-उड्डाणपुलांचे जाळे तयार झाले, समुद्रसेतू उभा राहिला; तरीही इथल्या रस्त्यांवरून जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो. इतर शहरे आणि उर्वरित महाराष्ट्राची स्थितीही काही वेगळी नाही. गेल्या चार महिन्यांतील आकडेवारीतून रस्ते अपघातांचे भयाण वास्तव अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्रात गेल्या चार महिन्यांत १९,३८३ अपघातांमध्ये ५,३३३ जणांचे जीव गेले. त्यांपैकी ४५ टक्के अपघात मुंबईत झाले होते. अहमदनगर, पुणे, नाशिक व कोल्हापूर यांचा मुंबईनंतर क्रमांक आहे. मुंबईतील वाहनांची संख्या ४१ लाखांच्या घरात असून, त्यात २४ लाख दुचाकी, तर ११ लाख खासगी मोटारी आहेत. दर किलोमीटरमागे पावणेसहाशे मोटारी, इतकी ही वाहनांची घनता आहे. याचाच अर्थ, मुंबईत वाहनांना वेग पकडणे कठीण असते; तरीदेखील अपघातांची संख्या लक्षणीय आहे. मुंबईत ठिकठिकाणी सुरू असलेली प्रकल्पांची कामे व त्यात सुरक्षानियमांच्या काटेकोर पालनाकडे होत असलेले दुर्लक्ष अपघातांना निमंत्रण देणारे ठरते. व्यापारउदिम व वित्तीय केंद्रांसाठी दक्षिण मुंबईवरचा भार कमी करण्याच्या कितीही घोषणा झाल्या, तरी अजूनही मोठ्या संख्येने लोक उत्तर ते दक्षिण असाच प्रवास करतात; त्यामुळे दोन्ही महामार्गांवर कोंडी झालेली असते. गेल्या दहा वर्षांत उभ्या राहिलेल्या पूर्व द्रुतगती मार्गावरही सकाळी दक्षिण मुंबईच्या दिशेने व सायंकाळी मुंबईतून बाहेर पडण्याच्या दिशेने अतोनात कोंडी होते. हा मार्ग तसा अरुंद असल्याने, तेथे वेगात जाणाऱ्या वाहनांचा वळणांवर ताबा सुटतो. नवी मुंबईचा पाम बीच मार्ग रुंद असूनही अपघातप्रवण. कधी तरीच चार लेनचा मोकळा रस्ता दृष्टीस पडल्यावर वाहने सुसाट धावू लागतात व दुभाजक ओलांडून कधी उलटतात, ते कळत नाही. रस्ते अपघातांची कारणे ही मुख्यत्वे दोन प्रकारची आहेत. एक म्हणजे रस्त्यांची दुर्दशा आणि अक्षम्य हेळसांड, तर दुसरे म्हणजे वाहनचालकांची बेफिकीरी आणि बेशिस्त. रस्त्यांच्या दुर्दशेबद्दल काय आणि कुणाकुणाला बोलावे? मुंबई-गोवा महामार्गाविषयी न्यायालयानेही कित्येकदा ताशेरे ओढले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची वेगवान कामाबद्दल ख्याती असूनही, मुंबई-गोवा महामार्गाविषयी असा कामाचा झपाटा लोकांना अनुभवण्यास मिळाला नाही. जिथे रस्ता सुधारला, तिथेही सूचनाफलक व इतर सोयीसुविधांची वानवा आहे. रस्तेवाहतुकीच्या निकषांचे अत्युच्च अस्तित्व म्हणजे आपल्याकडे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे मानला जातो. येथेही रस्त्यांची कामे सुरू असताना काय घडते, ते गेल्याच आठवड्यात झालेल्या भीषण अपघाताने दाखवून दिले. आपल्याकडे कुणी नेते, पक्षप्रमुख यांना वाईट रस्ते, वाहतूक कोंडी यांचा जाच झाला, की चांगल्या दर्जाच्या रस्तेउभारणीचा नारळ फुटतो, याचे उदाहरण म्हणजे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-नाशिक महामार्ग. बाकी जनता रस्त्यांच्या नावाने ओरड करते, तेव्हा त्याची दखल कुणी घेत नाही. पूर्वी 'गतिरोधक पुढे आहे' हे सूचनाफलक शब्दांच्या चुकीच्या क्रमवारीमुळे विनोदाचा विषय ठरत; परंतु किमान ते फलक तरी असायचे. आता हे फलक शोधावे लागतात आणि गतिरोधक तर नानाविध प्रकारचे असतात. ते गती रोखण्यासाठी आहेत, की प्रवाशांचा कपाळमोक्ष व वाहनाच्या इंधनटाकीची गळाभेट व्हावी यासाठी आहेत, असा प्रश्न पडावा. रस्त्यावर दिवाबत्तीचीही वानवाच असते. कोट्यवधींची कंत्राटे निघतात, तरी रस्त्यांना खड्ड्यांची ठिगळेच. इतर राज्यांतील प्रवासी महाराष्ट्रातील रस्त्यांच्या दुरवस्थेची कीव करतात. कोट्यावधी रुपयांच्या कंत्राटात पैसे कोणत्या मार्गांवर झिरपतात, ते कोण शोधणार? वाहनचालकांची बेशिस्त व वरील समस्यांचा गुणाकार झाल्यास मिळणारे उत्तर प्राणावर बेतणारे असते. ज्या भागात वाहनांना कूर्मगतीनेच जावे लागते, अशा ठिकाणीही अपघातांची संख्या मोठी असते. 'अतिघाई संकटात नेई' हे वचन फलकापुरते नसून, वाहनचालकांच्या गळी उतरवण्याची वेळ आली आहे. आपल्याकडील वाहनचालक तयार करणारे कारखाने हे अवघ्या २० दिवसांत दररोज केवळ २० मिनिटांची शिकवणी देऊन, शिकाऊ वाहनचालकाला परवान्यासाठी तयार करतात. इतक्या झटपट प्रशिक्षणातून तयार होणारे मोटारचालक आणि आपली दिव्य वाहतूक कोंडी हे रसायन अपघातांना निमंत्रण देणारे ठरते. रात्री-अपरात्री मोकळ्या रस्त्यांवर शर्यत लावणारे, लांब सळया असूनही धोक्याचा कंदिल न लावणारे ट्रकवाले, ब्रेक लाइट नसलेल्या सार्वजनिक उपक्रमांच्या बसगाड्या, मध्येच यू टर्न घेणारे रिक्षावाले आणि आरसा-हेल्मेट त्याज्य मानणारे दुचाकीस्वार हे सर्व जण प्रत्येक शहर-गावांत असतातच. रस्तोरस्तीच्या या यमदूतांपुढे वाहतूक पोलिसांचे अस्तित्व निष्प्रभ होऊन जाते. त्यांचीही ख्याती शिस्तपालनाच्या सक्तीपेक्षा मिटवामिटवीबद्दलच अधिक. जीवघेण्या अपघातातून वाचलेल्यांचे आयुष्य सावरण्यास कित्येक वर्षे लागतात. भय इथले संपत नाही, अशीच आपल्या रस्त्यांची अवस्था सध्या तरी आहे.

# सिडको प्रशासन कडून चाणजे येथील शेतकऱ्यांची दिशाभूल ; लेखी आश्वासन न मिळाल्याने शेतकरी संतप्त

## चाणजे शेतकरी संघर्ष समिती विविध मागण्यांबाबत आक्रमक

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मौजे चाणजे येथील द्रोणागिरी धारण तलाव क्र.२ वर शेतजमीनीच्या सुरक्षितेसाठी असलेले साकव वरून बेकायदेशीररित्या जडवाहतूक सुरु आहे. येथे जड वाहनांना बंदी असूनही जड वाहनांची वाहतूक नेहमी सुरु असल्याने हे जड वाहतूक थांबवून हाईट गेज पूर्ववत करून साकवचे अस्तित्व अबाधित ठेवावेत अन्यथा चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बाधित शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला होता. या महत्वाच्या समस्यावर दिनांक २६/४/२०२२ रोजी तहसील कार्यालय उरण येथे महत्वाची मिटिंग संपन्न झाली.

या मिटिंग मध्ये करंजा टर्मिनल कंपनीचे अधिकारी , तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, सिडको प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते. मात्र या बैठकीतून कोणताही तोडगा निघाला नाही. या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांचा विश्वासघात केल्याचा आरोप चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी केला होता .सदर ठिकाणी संबंधित साकव/खारबंड रस्ता याचा थेट संबंध येथील शेतकऱ्यांच्या जमिनीशी असून देखील करंजा टर्मिनल कंपनीचा काहीही संबंध नसताना येथील बाधित शेतकऱ्यांना न विचारता,न जुमानता बेकायदेशीर जड वाहतूक सुरु आहे.सदर ठिकाणी जड वाहतूक संबंधि शेतकरी यांची कोणतेही परवानगी न घेता त्या जागेवर विविध कामे सुरु आहेत.जड वाहनांची ये जा सुरु आहे. अनेकवेळा पत्रव्यवहार करूनही समस्या सुटत नसल्याने,या महत्वाच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे अविनाश म्हात्रे यांनी बैठकीत सांगितले होते.

कोणत्याही मागण्या पूर्ण होत नसल्याने बाधित शेतकऱ्यांनी चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ मे २०२२ पासून आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता मात्र पोलीस प्रशासनाने हा प्रश्न सोडविण्यासाठी मध्यस्थी केली. यावेळी सिडको प्रशासन, पोलीस प्रशासन, चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी सदस्य यांच्यात गुरवार दिनांक १९/५/२०२२ रोजी विविध समस्यावर बैठक झाली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, सिडकोचे द्रोणागिरी विभागाचे कार्यकारी अभियंता मुंडे, करंजा टर्मिनलचे अधिकारी रंगनाथ गरुड, चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.यावेळी सिडको प्रशासनाने लेखी आश्वासन देण्याचे पोलीस अधिकाऱ्यांच्या समक्ष आश्वासन दिले होते.सदर ठिकाणी संबंधित साकव /खारबंड रस्त्यावर २५० एकर शेतजमिनीचे अस्तित्व अवलंबून आहे. त्या अनुषंगाने साकव खारबंड रस्ता सुरक्षा संदर्भात लेखी आश्वासन देण्याचे कबूल केले होते.यावेळी सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या.मात्र अजूनही लेखी पत्र बाधित शेतकऱ्यांना न मिळाल्याने शेतकरी आता संतप्त झाले आहेत. सिडको प्रशासनाने लेखी लिहून देऊ असे आश्वासन दिले होते.मात्र अद्यापही लेखी लिहून न दिल्याने सिडको व इतर प्रशासनाने शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. शेतकऱ्यांना अंधारात ठेवत येथील शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचा आरोप चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी केला आहे.



## पुर्नवसनाबाबत बैठक घ्या : अॅड.वृषाली वाघमारे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विभागातील झोपपट्टीच्या पुर्नवसनाबाबत बैठक घेण्याबाबत पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अॅड. वृषाली वाघमारे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

सिडको विभागातील झोपड पट्टीच्या पुर्नवसनासंदर्भातील पुढील नियोजन बद्दलची पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त, सिडको व्यवस्थापकीय संचालक यांच्या समवेत एकत्रित मिटींग लावणे गरजेचे आहे.

त्यानंतरच आपणास पनवेल महानगरपालिकेची पुर्नवसनासंदर्भाची भुमिका व सिडको प्रशासनाची पुर्नवसन संदर्भात स्पष्ट भूमिका कळेल. त्याप्रमाणे झोपडपट्टी विभागातील प्रश्नांची उत्तरे देता येतील.


## तळा नगरपंचायत तळा

**मु.पो.तळा, जि.रायगड, पिन कोड ४०२१११**

**फोन नं.०२१४०-२६९०२१** Email id : nagarpanchyattala@gmail.com

**महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ (१) अन्वये नोटीस**

### जाहीर सूचना

तळा नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, आता पावसाळा सुरू होत असून कोणतीही धोकादायक इमारत किंवा इतर संरचना किंवा अशा इमारतीवर किंवा संरचनेवर बसविलेली कोणतीही वास्तू भग्नावस्थेत असेल किंवा पडण्याचा संभव असेल अशा इमारतीत किंवा संरचनेत व इतर कोणत्याही संरचनेत किंवा तिच्या शेजारच्या जागेत राहणाऱ्या आश्रय घेणाऱ्या तिच्या जवळून जाणाऱ्या येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तिच्यापासून कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होत असेल तर तशा घरांचा वापर तात्काळ बंद करावा. पावसाळ्यापूर्वी अशी इमारत, संरचना किंवा वास्तू पाडावी, मजबूत करावी त्याकरिता तळा नगरपंचायत कार्यालयात पूर्व परवानगीसाठी रितसर अर्ज करावा. घरांच्या भिंती पडाऊ झालेले असल्यास त्वरित इतर कोणाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान न होता घरे व पडाऊ भिंती उतरवून घ्याव्यात व दुरुस्ती करण्यासंबंधी कार्यवाही करून संभाव्य अपघात टाळावा.

जिर्ण व मोडकळीस घरांचा / इमारतीचां पडाऊ भाग पडल्यास व त्यापासून वित्तहानी अगर प्राणहानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही व झालेल्या हानिस घर मालक, इमारत मालक त्यांचे वारस व भोगवटादार सर्वस्वी जबाबदार राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तरी आपली निवासस्थाने त्वरित स्वखर्चाने काढून इतरत्र हलविण्याची व्यवस्था करावी. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**तळा नगरपंचायत,**
**तळा, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## सुरू असलेली सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत : खा.श्रीरंग बारणे

ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रम, प्रधान मंत्री आवास योजना (शहरी), स्वच्छ भारत मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, जल जिवन अभियान, प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, डिजिटल इंडिया भूमि अभिलेख नुतनीकरण कार्यक्रम, दीन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना, महामार्ग प्राधिकरण मार्फत सुरु असलेली महामार्गांवर कामे या योजनांच्या कामांचा आढावा घेवून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत तातडीने पात्र लाभार्थ्यांना घरकुल अनुदान देऊन घर बांधण्यास सहकार्य करावे, जिल्ह्यातंर्गत रस्ते तसेच महामार्गाच्या कामांमध्ये गुणवत्तापूर्ण सुधारणा कराव्यात, कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनेंतर्गत सर्व कामे प्राधान्याने विहीत मुदतीत पूर्ण करावीत, नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात असलेल्या शहरे व ग्रामपंचायत हद्दीत सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबवावेत, जिल्ह्यात शेतकरी, ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देत सर्व मूलभूत सोयीसुविधा गुणवत्तापूर्ण उपलब्ध करुन द्याव्यात, सिंचन विषयक सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत, यासह इतर सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद पाणी व पुरवठा विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी केले.

## पॅनेसिया हॉस्पिटल मध्ये अद्ययावत कॅथ लॅब रुग्णांच्या सेवेमध्ये रुजू

लॅब मध्ये आहे. डॉक्टर सुभाष सिंग व पॅनेशिया हॉस्पिटलच्या टीमला शुभेच्छा देण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंग, आमदार बाळाराम पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, सुप्रसिद्ध उद्योजक जे एम म्हात्रे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख शिरीष घरत, पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉक्टर कविता चौतमोल, कामगार नेते प्रकाश म्हात्रे, बबन विश्वकर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवसंपर्क अभियानाचा दुसरा टप्पा पनवेलमध्ये उत्साहात : खा.राजन विचारे

प्रकाराची अडचण निर्माण होणार नाही असे आश्वासित केले. तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत आदिवासी महिलांना रेशन कार्ड चे वाटप देखिल करण्यात आले. खांदा कॉलनी येथे आयोजित केलेल्या शिवसंपर्क अभियानात शिक्षक, डॉक्टर, वकील व व्यापारी त्यांच्या समस्यांचे निरासन होणार -खासदार राजन विचारे यांचा पुढाकार शिवसंपर्क अभियानाची सभा पनवेल खांदा कॉलनी येथील बेल्लेझा बँक्वेट हॉल येथे पार पडली. या पनवेल मधील सभेला मोठ्या प्रमाणात व्यापारी, वकील, डॉक्टर, शिक्षक व रेल्वे संघटनांच्या प्रतिनिधीनी मोठ्या संख्येने उपस्थिती दिली होती. या सर्वांनी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करून आपल्या समस्या खासदार राजन विचारे यांच्याकडे मांडल्या प्रश्नोत्तराच्या या सभेत नागरीकांच्या जास्तीत जास्त समस्या निवारण्याचा प्रयत्न खासदार राजन विचारे यांच्याकडून करण्यात आल्या. उर्वरित समस्यांबाबत संबधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा बैठक करण्यात येईल असे आश्वासित केले. तसेच कोविडच्या संकट काळात उत्कृष्ट काम केलेले सन्माननीय डॉक्टर, परिचारिका, स्वच्छ्ता दुत, स्मशान भूमीतील कर्माचारी अशा अनेकांचा यावेळी कोविड योद्धा सन्मान पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील, आमदार महेंद्र थोरवे, रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, विधानसभा संघटक दीपक निकम, तालुका संघटक भरत पाटील, खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के, नविन पनवेल शहर प्रमुख यतीन देशमुख, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, महानगर समन्वयक दीपक घरत व इतर शिवसेना व युवासेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ९०८ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागास हस्तांतरण

करण्यात आलेले आहे. मा. पर्यावरण मंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांनुसार, एकूण सुमारे ९०८ हेक्टर कांदनवळाखालील जमीनीचे हस्तांतरणाबाबतची प्रक्रीया सिडकोतर्फे पूर्ण करण्यात आली आहे. यापैकी २७९ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात असून उर्वरित सिडकोच्या ताब्यात नसलेल्या जमीनीकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. आतापर्यंत सिडकोने पनवेल आणि उरण तालुक्यांतील कांदळवनाखालील १२५८ हेक्टर जमिनीचे हस्तातंरण पूर्ण केले असून नवी मुंबईतील संपूर्ण कांदळवन क्षेत्राचे हस्तातंरण करण्याची प्रक्रिया सिडकोने पूर्ण केली आहे.


### जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On Admission

आरटीएस अपिल क्र..../२०२२

**१) श्री.गजानन जयराम पाटील**
**२) श्री.द्वारकानाथ जयराम पाटील**
दोघेही रा.पिरकोन, ता.उरण, जि.रायगड — वादी

विरुद्ध

**१) श्री.पांडुरंग भालचंद्र तळेकर**
**२) श्री.जनार्दन कृष्णा म्हात्रे**
दोघेही रा.पिरकोन, पो.सारडे, ता.उरण, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : पिरकोन, ता.उरण, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.८३९ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.०९/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिरकोन, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १४ | ७ | ०.१२.७० पो.ख. ०.००.८० एकूण ०.१३.५० | २.३८ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०५/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**



**अॅड.संध्या लोखंडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात

एम.ए.नं.५६४/२०२२
ने.ता.२७/०७/२०२२

**श्री.विद्याधर महादेव कांबळे**
वय : ४७, धंदा : नोकरी
रा.सदनिका क्रं.१००३, दहावा मजला, गणेश टॉवर
स.गृ.सं.मर्या, सेक्टर १७, मोठा खांदा गाव,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

**पनवेल महानगरपालिका**
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा **कै.महादेव काशिनाथ कांबळे** यांचा मृत्यू दि.०८/०९/२०१४ रोजी पी.एल.६, १०/१, सेक्टर १, मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ येथे झाला आहे. सदर अर्जदार यांनी त्यांच्या वडिलांचा मृत्यूचा दाखला मिळणेकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार यांचे वडील **कै.महादेव काशिनाथ कांबळे** वर नमूद केलेल्या ठिकाणी मृत्यू झालेला आहे किंवा कसा हे कोणास समजविण्याचे असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवून अपल्या हरकती कळवाव्यात. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती घेतल्या नाहीत तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२४/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात
**अर्जदारातर्फे वकील : अॅड.आशिष पनवेलकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.५५६/२०२२
ने.ता.१६/०६/२०२२

**श्री.प्रदीप शांताराम तांबे**
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.५०४, प्लॉट नं.०३, सेक्टर १५,
एशियन हेरिटेज कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

**जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई **कै.अनुसया शांताराम तांबे** यांचा मृत्यू दि.०२/०५/२०२० रोजी माझ्या राहत्या घरी सेक्टर ९, फ्लॅट नं.३०३, प्लॉट नं.३५, सायबा को.ऑप.हौ.सोसायटी कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांची आई **कै.अनुसया शांताराम तांबे** यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू **कै.अनुसया शांताराम तांबे** या वर नमूद ठिकाणी मृत्यू झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२४/०५/२०२२ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.इंदलकर साहेब यांचे कोर्टात
**अर्जदारातर्फे वकील : अॅड.आशिष पनवेलकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.५६०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१६/०६/२०२२

**सौ.स्नेहा निलेश दिवेकर**
**पुर्वाश्रमीचे नाव स्नेहा विलास मयेकर**
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.१०१, प्लॉट नं.०७, सेक्टर १९, शिव पॅराडाईज
को.ऑ.हौ.सोसायटी, कामोठे, ता.पनेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या वडिलांची आई माझी आजी **कै.सुलोचना जगन्नाथ मयेकर** यांचा मृत्यू दि.१५/०९/२०२० रोजी माझ्या राहत्या घरी फ्लॅट नं.१०१, प्लॉट नं.०७, सेक्टर १९, शिव पॅराडाईज को.ऑप.हौ.सोसायटी, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांच्या वडिलांची आई माझी आजी **कै.सुलोचना जगन्नाथ मयेकर** यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू **कै.सुलोचना जगन्नाथ मयेकर** या वर नमूद ठिकाणी मृत्यू झााले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२४/०५/२०२२ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



**अॅड.संध्या लोखंडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात

एम.ए.नं.५६५/२०२२
ने.ता.२७/०७/२०२२

**श्री.विद्याधर महादेव कांबळे**
वय : ४७, धंदा : नोकरी
रा.सदनिका क्रं.१००३, दहावा मजला, गणेश टॉवर
स.गृ.सं.मर्या, सेक्टर १७, मोठा खांदा गाव,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

**पनवेल महानगरपालिका**
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा **कै.सुशिला महादेव कांबळे** यांचा मृत्यू दि.३१/०७/२०१४ रोजी पी.एल.६, १०/१, सेक्टर १, मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ येथे झाला आहे. सदर अर्जदार यांनी त्यांच्या आईचा मृत्यूचा दाखला मिळणेकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार यांची आई **कै.सुशिला महादेव कांबळे** वर नमूद केलेल्या ठिकाणी मृत्यू झालेला आहे किंवा कसा हे कोणास समजविण्याचे असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवून अपल्या हरकती कळवाव्यात. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती घेतल्या नाहीत तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२४/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अलिबाग येथील मुलांचे शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, हे गौरीनंदन अपार्टमेंट, गणेशमंदीर शेजारी, विजय नगर, वरसोली- अलिबाग, जि. रायगड येथे कार्यरत आहे. या वसतिगृहाची मान्य संख्या ७५ आहे.

या वसतिगृहात इ.८ वी पासून प्रवर्गनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे आहे:- अनुसूचित जाती- ८० टक्के अनुसूचित जमाती- ०३ टक्के, विमुक्त जाती, भटक्या जमाती- ०५ टक्के, आर्थिक मागास व इतर मागास वर्गातील दारिद्र्यरेषेखालील कुटूंबातील विद्यार्थी ५ टक्के, विशेष मागास प्रवर्ग- ०२ टक्के, अनाथ- ०२ टक्के, अपंग- ०३ टक्के.

या वसतिगृहामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थ्याकरिता मोफत निवासव्यवस्था आहे. वसतिगृहामध्ये नाष्टा व भोजनाची विनामूल्य व्यवस्था आहे. नाश्ता :- दररोज पाहे/शिरा/उपीट इ. पैकी एक आलटून पालटून तसेच उकडलेली दोन अंडी, एक सफरचंद, आणि ऋतुमानानुसार एक फळ व दूध दररोज नाष्ट्यासाठी विनामूल्य देण्यात येते. भोजन व्यवस्था :- दुपार व सायंकाळी जेवण ( डाळ, भात, चपाती, भाजी/उसळ, लोणचे, पापड, सलाड इ.सह आठवडयातून दोन वेळा मासांहार ) देण्यात येतो. वसतिगृहामध्ये ८ वी ते १० वी च्या प्रवेशितांना अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके, शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामुल्य पुरविले जाते. तसेच ११ वी पासून पुढील इयत्तेत शिकणाऱ्या प्रवेशितांना रुपये ४ हजार वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता देण्यात येतो. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून रु६००/- मासिक निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेष पात्र महा. विद्यार्थ्यांना दोन संचाकरिता गणवेष भत्ता/ रेनकोट/छत्री भत्ता दिला जातो. हे भत्ते त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येतात. या व्यतिरिक्त संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडासाहित्य, मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत. प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्व मार्गानी वार्षिक उत्पन्न अनु. जाती, अनु.जमाती विद्यार्थींनीकरिता रुपये २ लाख ५० हजारचे आत, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, अंपग व अनाथ विद्यार्थ्यांकरिता रुपये १ लाखाच्या आत असावे. ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांचे सहीचा सन २०२१-२२ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, बँक खाते पासबूक झेरॉक्स, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईज फोटो- २ आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.

# भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन टाऊनशिप येथे संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टच्या मल्टीपर्पज हॉल जेएनपीटी टाऊनशिप येथे भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच पार पाडण्यात आले.



या अधिवेशनात जेएनपीटी चे कामगार नेते सुरेश पाटील यांची भारतीय पोर्ट आणि डॉक महासंघाच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी दुसऱ्यांदा फेर निवड करून त्यांची राष्ट्रीय पोर्ट वेतन निश्चिती समितीवर सुद्धा निवड केली गेली, तसेच श्री सुधीर घरत यांची राष्ट्रीय कोषाध्यक्ष म्हणून फेर निवड केली गेली.सुरेश पाटील तर सुधीर घरत या दोन्ही कामगार नेत्यांच्या भारतीय पोर्ट आणि डॉक मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या पदांवर निवड झाल्याबद्दल कामगार वर्गातून त्यांचे विशेष अभिनंदन केले.

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदुर महासंघ ही राष्ट्रीय पातळीवरील पोर्ट आणि डॉक मध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी देशातील एक प्रमुख लढाऊ कामगार संघटना असून या संघटनेने नेहमी कामगारांच्या हिताचे रक्षण करून कामगारांना त्यांचे हक्क व सन्मान मिळवून दिला आहे,त्यामुळेच या संघटनेला देशभरातील प्रमुख बंदरात कामगारांचा मोठा पाठिंबा आहे.

या दोन दिवस चाललेल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्दघाटन मा. रवींद्र हिमते राष्ट्रीय सचिव- भारतीय मजदूर संघ यांच्या शुभहस्ते झाले तसेच उरणचे आ. महेश बालदी यांनी स्वागताध्यक्ष म्हणून सर्व मान्यवर व देश पातळीवरून या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या कामगार बंधू भगिनींचे स्वागत केले.

तसेच आ. प्रशांत ठाकूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून त्यांनी या राष्ट्रीय अधिवेशनात मार्गदर्शन केले. तसेच मा.चंद्रकांत अण्णा धुमाळ प्रभारी- इंडस्ट्री आणि पोर्ट यांनी बहुमोल मार्गदर्शन केले ,त्याचबरोबर मा. अनिल ढुमणे प्रदेशाध्यक्ष- भारतीय मजदूर संघ यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. या राष्ट्रीय अधिवेशनात कामगार कायदे, कंत्राटी कामगारांचे प्रश्न, कामगारांची सुरक्षा ,खाजगीकरण तसेच शासनाची कामगार विषयक धोरणे इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांवर सखोल चर्चा होऊन कामगारांच्या हिताच्या बाबतीत ठराव संमत केले. हे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेषण यशस्वी करण्यात कामगार नेते सुरेश पाटील राष्ट्रीय सरचिटणीस- भारतीय पोर्ट आणि डॉक मजदूर महासंघ , सुधीर घरत राष्ट्रीय कोषाध्यक्ष- भारतीय पोर्ट आणि डॉक मजदूर महासंघ रविंद्र पाटील सरचिटणीस -जेएनपीटी वर्कर्स युनियन जनार्दन बंडा सरचिटणीस- जेएनपीटी जनरल कामगार संघटना , मधुकर पाटील उपाध्यक्ष -जेएनपीटी जनरल कामगार संघटना यांनी विशेष मेहनत घेऊन हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी केले.

# शिवशंभु प्रतिष्ठानने अवचित गडावरील ऐतिहासिक कुंडाचे काढले गाळ

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यासह जिल्ह्यातील गड किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे या मुख्य हेतून प्रेरित झालेल्या शिवशंभु प्रतिष्ठानच्या वतीने अवचित गडावरील ऐतिहासिक कुंडाचे गाळ काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिव छत्रपती शिवाजी महाराजांचे जाज्वल्य इतिहास शिव चरित्राचे प्रसार व प्रचाराचे उत्तम प्रकारे कार्य करणाऱ्या शिवशंभु प्रतिष्ठान चे अध्यक्ष विशाल तेलंगे यांच्या माध्यमातून गेली आठ वर्ष शिवशंभु प्रतिष्ठान रोहा तालुक्यातील किल्ले अवचितगड किल्ले घोसाळगड व किल्ले भवानी गड या गडांवर अविरतपणे संवर्धन करत आहेत.

तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील गड कोट किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे त्याच बरोबर गडावरील साठवण पाण्याच्या कुंडांची स्वच्छता अभियान अंतर्गत सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने मावळ्यांच्या सहकार्याने श्रम दानातून स्व - कष्टाने व मेहेनतीने सामुदायिक योगदानातून येथील ऐतिहासिक अवचित गडावरील कुंडाचे गाळ काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच स्तरांतून कौतुक होत असून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.



# राज्यस्तरिय दिव्यांग (पॅरा) कबड्डी स्पर्धेत रायगड (ब) विजेता

**दै.रायगड नगरी । पेण**

ऑल स्पोर्ट्स असोसिएशन फॉर डिसेबल्ड आयोजित, अंपग कल्याणकारी संस्था रायगड, दिव्यांग क्रिडा असोसिएशन नवी मुंबई, काळबादेवी युवक क्रीडा मंडळ गडब यांचे सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरिय दिव्यांग ( पॅरा ) कबड्डी स्पर्धेत रायगड ( ब ) संघाने विजेते पद मिळविले.

या स्पर्धेतील अंतिम सामना रायगड ( अ ) विरुध्द रायगड ( ब ) याच्यात झाला सुरवातीपासुनच रायगड ब संघाने या सान्नयावर आपली पकड ठेवली होती रायगड ब सघाचा अष्टपैलु खेळाडु सहदेव बरडे,आंतरराष्ट्रीय खेळाडु सचिन तांडेल यांनी आक्रमक खेळ करीत संघाच्या विजयात महत्वाची कामगिरी केली तर रायगड अ संघाचा आंतरराष्ट्रीय खेळाडु राजेश मोकल, मुकुल खांडे यांनी आपल्या संघाचा पराभव टाळण्याचा प्रयन्त केला परंतु त्याचे प्रयन्त कमी पडले अखेर हा सामना रायगड ब संघाने जिकुंन राज्य अंजिक्यपद स्पर्धेचे विजेतेपद मिळविले.

या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य अपंग कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, माजी आमदार धैर्यशिल पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, सहकार्यवाह आर.एन. म्हात्रे, रायगड जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, सरपंच अर्पणा कोठेकर, माजी उपसरपंच नितिन पाटील, प्रकाश पाटील,काळबादेवी मंडळाचे अध्यक्ष अंनत पाटील, मंगेश म्हात्रे आदि मान्यवररांचे हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक रायगड ब व्दितीय क्रमांक रायगड अ सर्वोकृष्ट खेळाडु सहदेव बोरडे- रायगड ( ब ) सर्वोत्कृष्ट चढाई राजेश मोकल - रायगड (अ ) यांना पारितोषक देण्यात आले. या स्पर्धेचे पारितोषक वितरण रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे.जे. पाटील, सदस्य जनार्दन पाटील,शिवाजी पवार शिवाजी पाटील, संकेत पाटील, राकेश मोकल आदि मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे समालोचन एस. वाय. लांगी यांनी केले. या स्पर्धेत रायगड ( अ ) ,सांगली,नवी मुंबई, नाशिक,रायगड ( ब ) मुंबई, सोलापुर,ठाणे येथील संघ सहभागी झाले होते



# गोंडाळे येथे जिल्हास्तरीय सांस्कृतिक नृत्य स्पर्धा, लहान गटात वेदा यादव, मोठ्या गटात नेहा पाटील प्रथम

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील साई मित्र मंडळ गोंडाळे यांच्या तर्फे नुकतेच गोंडाळे येथे जिल्हास्तरीय सांस्कृतिक नृत्यस्पर्धा संपन्न झाल्या. श्री साईबाबा मंदिर ५ वा वर्धापन दिन सोहळा व सत्यनारायण महापूजा या कार्यक्रमानिमित्त जिल्हास्तरीय खुल्या सांस्कृतिक नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. हे मंडळ गेली कित्येक वर्षापासून सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करत आहे. ही स्पर्धा छोटा आणि मोठा या दोन गटात पार पडली. छोटा गटात प्रथम क्रमांक वेदा विजय यादव, राहणार सिद्धेश्वर, द्वितीय क्रमांक आस्था प्रमोद दळवी राहणार आंबोले, तृतीय क्रमांक रितीका नरेश शिंदे, राहणार भार्जे. तर मोठा गटात प्रथम क्रमांक नेहा पाटील, राहणार पेण. द्वितीय क्रमांक निलेश म्हात्रे, राहणार उरण, तृतीय क्रमांक विभा नाईक, राहणार उरण यांनी पटकावला आहे. विजेत्यांना रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील गुणवंत कलाकारांनी आपला सहभाग नोंदविला होता त्या सर्व सहभागी स्पर्धकांना आकर्षक चषक देऊन साई मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्याकडून गौरविण्यात आले.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : आंभेरपाडा, ता.कर्जत, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची **श्रीम.सुमन सोनू संगारे,** रा.आंभेरपाडा, ता.कर्जत, जि.रायगड याचे मालकी हक्क, ताबेकब्जा व वहिवाटीतील असलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी **श्रीम.सुमन सोनू संगारे** यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : आंभेरपाडा, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३९ | १/अ | ०-४४-९० | २.०० |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्आने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकती घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.२४/०५/२०२२
स्थळ : पनवेल

**सही/-**
**ॲड.प्रदीप श. म्हात्रे**
**ॲडव्होकेटस ॲड लिगल कन्सल्टंटस्**
**कार्या : बी/१०४, पहिला मजला, पायोनिअर को.ऑप.हौसिंग सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : आडीवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही श्री.जगदीश वामनराव व इतर यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. सदरहू मिळकतीत **१) श्री.जगदीश वामनराव पाटील, २) सौ.वैशाली अशिश पाटील, ३) श्री.द्रोनेश अशिश पाटील, ४) श्री.विनेश अशिश पाटील** यांचे ताबेकब्जात, वहिवाटीतील, वापरातील व हिश्श्यातील असलेली १०२ गुंठे जमीन ही आमचे अशिलांनी **१) श्री.जगदीश वामनराव पाटील, २) सौ.वैशाली अशिश पाटील, ३) श्री.द्रोनेश अशिश पाटील, ४) श्री.विनेश अशिश पाटील** यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : आडीवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| गांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| आडीवली | १३६ | २-०४-१० पैकी १-०२-०० गुंठे | २१.९४ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाा, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **एकवीस (२१) दिवसाच्या** मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजरहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.२४/०५/२०२२

**सही/-**
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा पाचनंद, भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८**
**मो.नं.९२२२२२७१६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद वर्णन केलेली मिळकत ही **श्री.राजीव हसमुखलाल अजमेरा** यांचे संमतीने आमचे अशिलांना हस्तांतर करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती सदर हस्तांतर करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार असल्याची खात्री, हमी व भरवसा जमिनीचे मुळ मालक **श्री.राजीव हसमुखलाल अजमेरा,** यांनी आमचे अशिलांना दिला आहे.

सबब सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांचे** आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून व कागदपत्रे दाखूवन आमची खात्री पटवून द्यावी व स्वतःची लेखी हरकत आमचेकडे नोंदवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी समजून सदर मिळकतीचा हस्तांतराचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब सदरहू नमूद मिळकतीच्या टायटल व मालकी हक्क जाणून घेण्याकरिता सदरहूची जाहीर नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

तुकडी व जिल्हा : रायगड, पोटतुकडी व तालुका : कर्जत व तसेच जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती, रायगड व **''ग्रुप ग्रामपंचायत : साळोख तर्फे वरेडी''** यांचे हद्दीतील आणि मे.दुय्यम निबंधक : कर्जत, रायगड यांचे अधिकार क्षेत्रातील **मौजे : साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड यांसी...**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील...**

| क्र. | गट क्र./ सर्व्हे नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १६८, हिस्सा नं.६ ड (डी) | भोगवटादार वर्ग १ | ०-२३-०० | - |
| | एकूण क्षेत्रफळ | श्री.राजीव हसमुखलाल अजमेरा, यांच्या मालकीचे व महसूल अभिलेखास नोंद असलेले क्षेत्र हे सदरहू खरेदी विक्री व्यवहाराचा विषय आहे. | | |

येणेप्रमाणे जमीन मिळकत असे व तिचेशी ॲटॅच्ड हक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : २५/०५/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.श्री.एस.व्ही.क्षीरसागर**
**डी-६०७२, डी विंग, ६ वा मजला, बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद वर्णन केलेली मिळकत ही **श्री.संजय हसमुखलाल अजमेरा व जतीन हसमुखलाल अजमेरा,** यांचे संमतीने आमचे अशिलांना हस्तांतर करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती सदर हस्तांतर करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार असल्याची खात्री, हमी व भरवसा जमिनीचे मुळ मालक **श्री.संजय हसमुखलाल अजमेरा व जतीन हसमुखलाल अजमेरा,** यांनी आमचे अशिलांना दिला आहे.

सबब सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून व कागदपत्रे दाखूवन आमची खात्री पटवून द्यावी व स्वतःची लेखी हरकत आमचेकडे नोंदवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी समजून सदर मिळकतीचा हस्तांतराचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब सदरहू नमूद मिळकतीच्या टायटल व मालकी हक्क जाणून घेण्याकरिता सदरहूची जाहीर नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

तुकडी व जिल्हा : रायगड, पोटतुकडी व तालुका : कर्जत व तसेच जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती, रायगड व **''ग्रुप ग्रामपंचायत : साळोख तर्फे वरेडी''** यांचे हद्दीतील आणि मे.दुय्यम निबंधक : कर्जत, रायगड यांचे अधिकार क्षेत्रातील **मौजे : साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड यांसी...**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील...**

| क्र. | गट क्र./ सर्व्हे नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १६८, हिस्सा नं.६ क (सी) | भोगवटादार वर्ग १ | ०-७२-७५ | - |
| | एकूण क्षेत्रफळ | श्री.संजय हसमुखलाल अजमेरा आणि जतीन हसमुखलाल अजमेरा, यांच्या मालकीचे व महसूल अभिलेखास नोंद असलेले क्षेत्र हे सदरहू खरेदी विक्री व्यवहाराचा विषय आहे. | | |

येणेप्रमाणे जमीन मिळकत असे व तिचेशी ॲटॅच्ड हक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : २५/०५/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.श्री.एस.व्ही.क्षीरसागर**
**डी-६०७२, डी विंग, ६ वा मजला, बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**

## जाहीर नोटीस

तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात

क्र.मशा/आर.टी.एस./फेर चौकशी/रजि नं.०८/२०२१

१) श्री.हरिश्चंद्र गणू शेळके
रा.आर्ढे, पो.मानिवली, ता.कर्जत, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

१) श्रीम.कुसूम बबन शेळके
२) श्रीम.कविता खंडू म्हसकर
३) श्रीम.कोंडाबाई महादू चौधरी
रा.पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
४) श्रीम.कल्पना लक्ष्मण खडे
५) श्री.तुकाराम नारायण शेळके
रा.आर्ढे, ता.कर्जत, जि.रायगगड
६) श्रीम.हिराबाई गोटीराम फराट
रा.फराटवाडा, ता.कर्जत, जि.रायगड
७) श्रीम.ममता पांडुरंग मालुसे
रा.मोरीवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
८) श्रीम.सुरेखा राम जाधव
९) श्री.तानाजी बापू विशे (मयत) यांचे वारस
अ) श्री.दिपक तानाजी विशे
ब) श्री.सुनील तानाजी विशे
क) श्रीम.सुमन तानाजी विशे
१०) श्री.श्रीधर बापू विशे
११) श्री.तुकाराम बापू विशे
१२) श्री.रामदास बापू विशे
१३) श्री.अनंता बापू विशे
१४) श्री.संजय बापू विशे
१५) श्री.धनंजय बापू विशे
१६) श्रीम.मंदाबाई गजानन विशे
१७) श्री.अनिल गजानन विशे
१८) श्री.नितीन गजानन विशे
१९) श्री.अविनाश गजानन विशे
२०) श्रीम.उषा गजानन विशे
२१) श्रीम.सुशिला दत्तात्रय पाटील
रा.पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
२२) श्रीम.उज्वला चारुदत्त दगडे
२३) श्री.सुरेश नारायण लाड
२४) श्रीम.रोहिणी रमेश लाड
२५) श्री.राजेश रमेश लाड
२६) श्री.विलास रमेश लाड
२७) श्रीम.रजनी रमेश लाड उर्फ प्रिया राजेश वाळीबे
२८) श्री.चारुदत्त वसंतराव दगडे (मयत) यांचे वारस
अ) श्रीम.उज्वला चारुदत्त दगडे
ब) श्री.ओंकार चारुदत्त दगडे
२९) श्रीम.ज्योती शरद दगडे
३०) श्री.आनंद शरद दगडे
३१) श्रीम.कामिनी शरद दगडे
३२) श्रीम.मंजिरी मदनराव दगडे
रा.दहिवली त.नोड, ता.कर्जत, जि.रायगड
३३) श्रीम.निर्मला पुंडलिक मते
रा.कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
३४) श्री.रामभाऊ गणपत बोराडे
रा.हालीवली, ता.कर्जत, जि.रायगड
३५) श्रीम.इंदिराबाई एकनाथ पिंगळे
रा.केलवली, ता.खालापूर, जि.रायगड
३६) श्री.संतोष नारायण म्हसे
रा.निकोप, मानिवली, ता.कर्जत, जि.रायगड
३७) श्रीम.विमल रामदास कडव
रा.इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
३८) श्रीम.सुजाता मारुती पाटील
रा.चांभार्ली, ता.खालापूर, जि.रायगड
३९) श्रीम.लतिका तुळशीराम शेलार (मयत) यांचे वारस
अ) श्री.नितीन तुळशीराम शेलार
ब) श्रीम.गौरी मानसी लोहार
रा.सेक्टर २८, फ्लॅट नं.४७, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४
४०) श्रीम.अनिता अनंत शिर्के
रा.पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
४१) श्रीम.सुवर्णा नंदकुमार जाधव
रा.पिंपळोली, ता.कर्जत, जि.रायगड सामनेवाले

सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : आर्ढे, ता.कर्जत, जि.रायगड येथील नमूद मिळकती संदर्भात फेरचौकशी प्रकरणी दाखल केलेले आहे. सदर दाव्यामध्ये दि.०५/०५/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले क्र.३ ते ४१ हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दि.०२/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसील कार्यालय कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच नमूद जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत तहसील कार्यालय, कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे : आर्ढे, ता.कर्जत | १३८/९ | १.७७.०० | ०.९१ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २३/०५/२०२२

**सही/-**
**तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत**

# संक्षिप्त...

## महिलेची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका महिलेस मारहाण करून तिची हत्या केल्याची घटना खान्देश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

आडवी गावातील एका नवीन बांधकामाच्या चार मजली इमारतीच्या टेरिसवर अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीने रेश्मा सचिन गरुडे (वय ३३) यांना दोन दिवसापूर्वी मारहाण केल्याने त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## टाटा टेम्पोची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका पांढऱ्या रंगाचा टाटा टेम्पो याची किंमत ३ लाख रुपये इतकी आहे त्याची चोरी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील कल्हे गावात घडली आहे.

प्रसाद राणे यांचा टेम्पो लेबर कॉन्ट्रॅक्टर कृष्णा याच्या ताब्यात दिला होता परंतु सदर टेम्पो त्यांच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे लबाडीच्या उद्देशाने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

## कॉइल अंगावर पडून त्यात दबून एक गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रेन ऑपरेटरच्या निष्काळजीपणामुळे ऑपरेट केलेल्या उचललेल्या कॉइलचा झोला जाऊन कॉईल एका इसमाच्या अंगावर पडल्याने त्यात तो गंभीररित्या जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील नवकार रेल्वे यार्ड येथे घडली आहे.

जयहिंद रामरतन राजभर (वय २०) असे या जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव असून त्याच्या ताब्यातील ट्रेलर क्रमांक एम एच ४६ बीएफ २०५७ वर लोखंडी पत्रा कॉईल हि क्रेन एम एच ४६ बी १५४४ वरील चालक आरोपी यशवंत खरात हे क्रेनद्वारे उचलून ट्रेलरवर ठेवत होते तेव्हा जयहिंद राजभर यांना दुसऱ्या कॉईलला हुक लावण्यास सांगितल्याने सदर काम करून जयहिंद राजभर बाजूला होत असताना क्रेन ऑपरेटरच्या निष्काळजीपणामुळे ऑपरेट केलेल्या उचललेल्या कॉइलचा झोला जाऊन कॉईल त्याच्या अंगावर पडल्याने त्यात तो गंभीररीत्या जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# तीलोरे येथे इर्टीगा कारची मोटार सायकलला जोरदार धडक

**दै.रायगड नगरी । माणगव**



मुंबई गोवा हायवेचे काम हे गेल्या अनेक वर्षापासून धिम्यागतीने चालू असून गेल्या अनेक वर्षापासून इंदापुर ते माणगांव दरम्यान रस्त्याचे काम सध्या एका कंपनीच्या ठेकेदाराकडून चालू असून कुठे खड्डे तर कुठे रस्त्याचे अर्धवट काम तसेच डिवायडर नसल्यामुळे कंपनी ठेकेदाराच्या या हलगर्जी पणामुळे या रस्त्यावर दररोज मोठे मोठे अपघात होत आहेत. अशाच प्रकारे दि.२२ मे रोजी कशेणे येथे देखील मोटार सायकल आणि कार अपघात होऊन काही तास न होतोय तोच तिलोरे येथे इर्टीका कार आणि मोटार सायकल अपघात होऊन मोटार सायकल स्वार गंभीर रीत्या जखमी झाला आहे.

सविस्तर वृत्त असे की सोमवार दि २३ मे रोजी तिलोरे येथे संध्याकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान एच एम ०६ /एपी/८५१३ ही मोटार सायकल घेऊन माणगांव वरून इंदापुरच्या दिशेने जात असताना तिलोरे येथे आला असता इर्टीका कार एम एच ०४ के एल १६०० ही इंदापुर वरून महाडच्या दिशेने जात असताना बेदखलपणे दुर्लक्ष करून रॉंग साईडने चालक चालवून मोटार सायकलला धडक दिल्याने हा अपघात झाल्याचे समजते.

हा अपघात झाल्याने मोटार सायकल चालक शैलेश हरी बिरगावले वय ४३ हे रस्त्याच्या बाजूस पडले होते याच वेळी रायगड जिल्हा पालकमंत्री ना.आदितीताई तटकरे या माणगांववरून आपला कार्यक्रम संपवून सुतारवाडीच्या दिशेने जात असताना तिलोरे येथे झालेल अपघात पहाताच त्या उतरल्या आणि कोणी जखमी झालय का कुणाला किती लागलंय हे विचारपूस करून त्यांनी माणगांव उप जिल्हा रूग्णालयाचे डॉ. इंगवले याच्याशी संपर्क करून जखमीना उपचार करण्यासाठी सांगितले तसेच या अपघाताचा कॉं. गु.रजि न.१४१/२०२२ भा,द.वी, स. कलम २७९, ३३७, ३३८, १८४, असून या अपघात स्थळी माणगांवचे पो.नि.पाटील यानी पाहणी केली असून गुन्हा दाखल केला आहे.अंमलदार सहाय्यक फौजदार भोजकर तसेच तपासी अधिकारी पोहवा कोळेकर हे पुढील तपास करीत आहेत

# वृध्द दाम्पत्याला घराची लाईट कापण्याची भिती दाखवून लांबवले पावणे चार लाख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इलेक्ट्रीकचे बिल अपडेट न झाल्याने घराची लाईट कापली जाणार असल्याची भिती दाखवून सायबर चोरट्याने उलवे परिसरातील वृध्द दाम्पत्याला त्यांच्या मोबाईलवर टिम व्हिवर क्विक सपोर्ट ॲप डाऊनलोड करण्यास सांगून त्यांच्या खात्यातून तब्बल पावणे चार लाखांची रक्कम पर-स्पर लांबवल्याची घटना घडली आहे. एनआरआय पोलिसांनी या सायबर चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सदर घटनेतील तक्रारदार रमेश पाटील (६८) उलवे, सेक्टर- २१ मध्ये पत्नी रुता पाटील (६४) यांच्यासह राहण्यास आहेत. पाटील दाम्पत्य सेवानिवृत्त झाले असून त्यांनी त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम ठेवली आहे. पाटील दाम्पत्य याच बँक खात्याचा इंटरनेट बँकीगसाठी वापर करत होते. एका सायबर चोरट्याने रमेश पाटील यांच्या मोबाईलवर मेसेज पाठवून त्यांच्या घराच्या इलेक्ट्रीकचे बिल बाकी असल्याने घराची लाईट कापली जाणार असल्याची भिती दाखवली. तसेच त्यांना तात्काळ संपर्क साधण्यासाठी मोबाईल नंबर पाठवून दिला. त्यामुळे पाटील यांनी सदर नंबरवर कॉल केला असता, सायबर चोरट्याने त्यांचे इलेक्ट्रीकचे बिल अपडेट न झाल्याने त्यांच्या घराची लाईट कापली जाणार असल्याचे सांगितले. त्यासाठी मोबाईल फोनवर टिम व्हिवर क्विक सपोर्ट नावाचे ॲप डाऊनलोड करुन त्याद्वारे शंभर रुपयांचे बिल भरण्यास सांगितले. त्यानुसार पाटील यांनी सदरचे ॲप डाऊनलोड करुन त्या ॲपच्या आयडीची माहिती सायबर चोरट्याला दिली. त्यानंतर पाटील यांनी पत्नीच्या बँक खात्यातून इंटरनेट बँकींग द्वारे १०० रुपयांचे बिल भरले. त्यानंतर काही वेळेतच त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यातून पैसे जात असल्याचे अनेक मेसेजेस त्यांच्या मोबाईलवर आले. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे पाटील यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क साधून पत्नीचे बँक खाते ब्लॉक केले. मात्र, तोपर्यंत सायबर चोरट्याने त्यांच्या खात्यातून पावणे चार लाख रुपये काढून घेतले. त्यानंतर पाटील दाम्पत्याने एनआरआय पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# वरवठणे येथील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वरवठणे गावातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व प्राण प्रतिष्ठापना सोहळा शनिवार दि. २१ ते सोमवार दि. २३ मे दरम्यानच्या तीन दिवसांत विविध धार्मिक विधी व इतर भरगच्च कार्यक्रमांनी संपन्न झाला. यानिमित्ताने मंदिरासाठी देणगी देणारे सर्व देण-गीदार, सर्व हितचिंतक यांचा तीन दिवसांच्या कार्यक्रमादरम्यान जीर्णोद्धार समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वरवरठणे येथील श्री हनुमान मंदिरासाठी तत्कालीन आमदार धैर्यशीलदादा पाटील यांनी ७.५ लाख रुपये व रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंदिर सभागृहासाठी ५ लाख रुपये निधी दिला होता.

त्यामुळे या जीर्णोद्धार सोहळ्याच्या निमित्ताने मंदिराच्या प्रवेशद्वारात दोन्ही बाजूला लावण्यात आलेल्या या निधीच्या नामफलकाचे अनावरण राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नागोठणे विभागीय ज्येष्ठ नेते भाई टके यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी संपन्न झाले. यावेळी जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष पांडुरंग मारुती म्हात्रे, उपाध्यक्ष नारायण म्हात्रे, सचिव दत्ताराम कर्जेकर, खजिनदार प्रभाकर म्हात्रे, सल्लागार किशोरभाई म्हात्रे, मारुती राणे, माजी सरपंच विठूशेठ म्हात्रे, यादव बैकर, पांडुरंग पाटील, कृष्णा सारले, पांडुरंग पारंगे, प्रकाश पाटील आदींसह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने आमदार रविशेठ पाटील, शिवसेना नेते किशोरभाई जैन, राष्ट्रवादीचे विलास चौलकर, संतोषभाई कोळी, सचिन कळसकर, रोहिदास हातनोलकर, रवि वाजे, रोशन पारंगे, नागोठण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर, पोलिस उपनिरिक्षक नारायण चव्हाण आदींसह अनेक मान्यवरांनी तीन दिवसांच्या या धार्मिक कार्यक्रमादरम्यान मंदिरात येऊन श्री हनुमान मुर्तीचे दर्शन घेतले. दरम्यान हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री हनुमान मंदिर जीर्णोद्धार समितीचे सर्व पदाधिकारी, सल्लागार, सदस्य व ग्रामस्थ तसेच महिला मंडळाने सहकार्य केले.

# दुधाच्या भुकटीची पाकिटे जाळली, पनवेल पंचायत समितीतील प्रकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकात्मिक बाल विकास केंद्रातील अंगणवाडीच्या मुलांना देण्यात येणारी दुधाच्या भुकटीची पाकिटे जाळण्यात आली आहेत. पनवेल पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास केंद्रातील हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

अंगणवाडीतील मुलांना सकस आ-हार मिळावा यासाठी शासन वेळोवेळी प्रयत्न करतो. मात्र त्यांच्यापर्यंत हा आहार पोहोचतोच असे नाही. यात देखील भ्रष्टाचार होतो. डॉ. एपीजे अब्दुल कलाम योजना अंतर्गत पनवेल तालुक्यातील पंचवीस अंगणवाड्यांना महानंदाच्या दुधाचे भुकटीचे पाकिटे देण्यात येतात. मात्र यातील काहीच पाकिटे अंगणवाड्यांना वाटली व काही पाकिटे एकात्मिक बाल विकास केंद्रात ठेवण्यात आली असल्याची माहिती समोर आली. या पाकिटांची तारीख संपल्यानंतर सुट्टीच्या दिवशी म्हणजे रविवारी २२ मे रोजी ही पाकिटे पंचायत समिती कार्यालयाच्या आव-ारात जाळण्यात आली. अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी आलेली पाकिटे जवळ



ठेवून त्यांची एक्सपायरी डेट संपेपर्यंत ती पाकिटे विद्यार्थ्यांना देण्यात आली नाहीत. त्यांना या दुधाच्या भुकटीपासून वंचित ठेवण्यात आले. दुधाच्या भुकटीची पाकिटे लहान बालकांना न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि दुधाच्या भुकटीची पाकिटे जाळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. याबाबत विस्तार अधिकारी एस. ठोंबरे यांच्याकडे चौकशी केली असता ही पाकिटे उंदीर, मांजर यांनी फोडली असल्याने जाळण्यात आली असल्याचे सांगितले. मात्र जर ही पाकिटे खराब झाली असतील तर ती सप्लाय करणाऱ्या पुरवठादाराकडे परत द्यायला हवी, जाळण्याचा अधिकार याना कोणी दिला असा सवाल उपस्थित झाला आहे.

# सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील सामाजिक न्याय विभागाच्या पनवेल येथील मुलींचे शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हे सेक्टर १०, प्लॉट नं.२१ ग्रीन पार्क सोसायटी समोर कळंबोली, ता.पनवेल, जि. रायगड येथे कार्यरत आहे.

या वसतिगृहामध्ये इयत्ता ८ ची पासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग यांना गुणवत्त-ेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा दररोज पोहे/शिरा/उपीट इ. पैकी एक,उकडलेली दोन अंडी, सफरचंद, आणि ऋतुमानानुसार एक फळ व दूध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण ( डाळ, भात, चपाती, भाजी/ उसळ, लोणचे, पापड इ.सह आठवडयातून दोन वेळा मासांहार ) देण्यात येतो.

अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके, शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामुल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून रु.६००/- निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय विद्यार्थीनींना रुपये १ हजार व महाविद्यालयीन विद्यार्थीनींना रुपये २ हजार गणेश भत्ता दिला जातो. सर्व विद्यार्थीनींना छत्री, रेनकोट व गमबुटसाठी रु.५००/- भत्ता दिला जातो. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य भत्ता रुपये ४ हजार व प्रोजेक्ट भत्ता रुपये १ हजार दिला जातो. या व्यतिरिक्त संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडासाहित्य, मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

प्रवेशपात्र विद्यार्थीनींच्या पालकांचे सर्व मार्गानी वार्षिक उत्पन्न अनु.जाती, अनु.जमाती विद्यार्थीनीकरिता रुपये २ लाख ५० हजारचे आत, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, विद्यार्थीनींकरिता रुपये १ लाखाच्या आत असावे.

ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत तहसिलदार यांच्या सहीचा सन २०२२-२३ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल श्रीमती एम.जे.नरहरे यांच्याशी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल श्रीमती एम.जे. नरहरे यांनी केले आहे.

# गरजू विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय : डॉ.आसिफ कासकर

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गोरगरिब, होतकरू व गरजू विद्यार्थी वर्गाच्या शैक्षणिक मदतीकरिता नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व साई फाऊंडेशन मुंबई



यांच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षात रोहे तालुक्यातील विविध माध्य.व प्राथ. शालेतील गरजू विद्यार्थाना मोफत शै.साहित्याचे वाटप करण्याबरोबर त्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती साई फाऊंडेशन मुंबईचे अध्यक्ष व नाईटिंगल ट्रस्टचे प्रतिनिधी डॉ.आसिफ कासकर यांनी आपल्या शै.उपक्रमाबाबत माहिती देताना पत्रकारांना सांगितले आहे.

तर साई फाऊंडेशन व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्टचे माध्यमातून राबविण्यात येणार असल्याच्या शैक्षणिक उपक्रमाबाबत पत्रकारांना माहिती देताना डॉ.आसिफ कासकर यांनी पुढे सागितले की,कोरोना काळाचा अपवाद सोडला तर ट्रस्टचे व फाऊंडेशनचे माध्यमातून गेली सात वर्षे सातत्याने सुमारे १००० विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे विविध प्रकारच्या शै.साहित्याचे मोफत वाटप ट्रस्टचे चेअरमन विरेश कोठारी यांच्या विशेष व महत्त्वपूर्ण सहकार्यातून व सामाजिक कार्यकर्ते तथा आमचे विश्वस्त संदीप विचारे,तौसिफ येरूणकर, डॉ. गौतम त्रेहान,डॉ. अमरप्रित घुरा व सुरेंद्रकुमार सुराना अलिअस.भैय्याजी यांच्या मदतीने आम्ही आमचा उपक्रम राबवित असून या वर्षी आमचे उद्दिष्ट याही पेक्षा अधिक गरजू विद्यार्थीच्या शैक्षणिक मदतीसाठी असणार आहे व त्या द्रुष्टीने आमचे चांगले प्रयत्न चालू आहेत.

प्रगत शैक्षणिक रायगड हे आमच्या ट्रस्टचे उद्दिष्ट असून या उद्दिष्टाच्या प्राप्तीकरिता मागील सात वर्षापासून रोहे तालुक्यातून प्रारंभ करण्यात आला असून त्या उद्देशाने या वर्षी शैक्षणिक वर्ष सुरू होतानाच विद्यार्थी वर्गाची शिक्षणाची सोय व्हावी या करिता लगेचच शै.साहित्याचे वाटप करण्यात येणार असून जून महिन्यातच आम्ही आमचे उद्दिष्ट साध्य करणार असून गरजू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये हेच आमचे ध्येय असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.तर विद्यार्थी वर्गाला स्पर्धा परीक्षेबाबत येणाऱ्या अडीअडचणींचा विचार करता त्यांच्यासाठीही व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे सांगतानाच इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षा प्रणालीचा.मोफत कार्यक्रम हाती घेणार असल्याचे शेवटी माहिती देताना सांगितले.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद सुधागड तालुका अध्यक्षपदी गौसखान पठाण यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पाली**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद सुधागड तालुका अध्यक्षपदी गौसखान पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवारी (ता.२४) जिल्हा अध्यक्ष विक्रम परमार यांनी गौसखान पठाण यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले आहे.



यावेळी विक्रम परमार यांनी सांगितले की सामाजिक, सांस्कृतिक व माध्यम क्षेत्रात कार्यरत असलेले गौसखान पठाण यांच्या अनुभवाचा व कामाचा फायदा संघटनेला होणार आहे. शिवाय त्यांच्या माध्यमातून तालुक्यातील तळागाळापर्यंत संघटना पोहचण्यासाठी मदत होईल. तर गौसखान पठाण म्हणाले की दिलेली जबाबदारी प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ पणे पार पाडण्याचा प्रयत्न करेन. या माध्यमातून संघटना वाढीबरोबरच सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यावर मार्ग काढण्यासाठी तत्पर राहणार आहे. गौसखान पठाण यांच्या निवडीबद्दल सर्वस्थरातून त्यांना शुभेच्छा व अभिनंदन करण्यात आले आहे.

# मुरुड मध्ये दहावी १९८४ सालच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुडमधील सर एस ए हायस्कूल च्या इयत्ता दहावीच्या १९८४ सालच्या सुमारे ३० विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र येऊन ३८ वर्षांपूर्वीच्या आठवणीना उजाळा दिला, भारावून गेलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पूर्वीच्या वर्गात बसून एकमेकांविषयी माहिती जाणून घेतली तसेच त्यांचे शिक्षक प्रकाश मसाल सर व इंग्रजीच्या शिक्षिका प्रतिमा मसाल, हायस्कूल चे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, मुख्याध्यापक सरोज राणे यांचे शाल श्रीफळ देऊन विद्यार्थ्यांनी स्वागत केले याप्रसंगी मार्गदर्शन करताना मसाल सर यांनी विद्यार्थांनी मूल्यमापन विषयाचे धडे घेताना भारतीय संस्कृतीची मूल्य कोणती आहेत हे जाणले आहेत त्यानुसार कृतज्ञतेच्या भावनेतून हे विद्यार्थी शाळेत एकत्र आल्याने संस्कृतीचे दर्शन घडविल्याचे सांगितले तसेच अध्यक्ष सुधाकर दांडेकर यांनी मार्गदर्शन करताना शाळेच्या सद्यस्थितीची माहिती दिली व मुख्याधापक सरोज राणे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

सोशल मीडियाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करणारे ॲडमिन वंदना वर्तक व विवेक आंबुर्ले यांचा विशेष सत्कार करण्यात आला व बँगलोर येथून आलेली विद्यार्थिनी सरिता नायक व मुंबईमधील डॉ. शुभदा दिवेकर यांचे विशेष स्वागत करण्यात आले , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आण्णा वाडकर व किशोर ठाकूर यांनी उत्कृष्ट रीतीने पार पाडले दुपारच्या सत्रात पूर्वीचे हिंदी विषयाचे शिक्षक विष्णू वर्तक यांची विद्यार्थ्यांनी निवास्थानी सदिच्छा भेट घेऊन मुरुड मधील बागडे ॲग्रो टुरिझम फार्म येथे शालेय जीवनात खेळलेले विविध खेळ किशोर ठाकूर यांनी घेऊन व केक कापून आनंद द्विगुणित केला , भोजनावर यथेच्छ ताव मारून पुढील वर्षी गृपतर्फे स्वछता मोहीम सारखे सामाजिक कार्य हाती घेण्याचा संकल्प केला याप्रसंगी माजी विद्यार्थी किरण रोटकर , सतीश आंबुर्ले, प्रसाद कजबजे, श्रीकांत खोत,किशोर ठाकूर, संदीप गुरव, संजय मिरजकर, संतोष महाडिक, वंदना वर्तक, ज्योती जोशी, सरिता नायक, सरिता पाटील, सुशील ठाकूर, शुभदा दिवेकर, अजय गर्जे, संदीप जठारी, संदेश कासेकर, उमेश करंदेकर , राजेंद्र कौलकर, अण्णा वाडकर, करुणा श्रीवर्धनकर , प्रभा कांबळी, अमोल वेदक, वंदना जोशी, मेघा आंबुर्ले, रमण विहूरकर इत्यादी उपस्थित होते

